# जाहिरात

ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले पुरस्कार सन २०२५-२६ या वर्षासाठीचे प्रस्ताव मार्गविण्यासाठी व्यापक प्रसिद्धी व्हावी, या हेतूने शिक्षण संचालक, (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य पुणे १६ या कार्यालयाच्या www.dhepune@gov.in संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेल्या शासन निर्णय दि.-१५.१२.२०११ नुसार इच्छुकांचे प्रस्ताव दि. ०१.१०.२०२६ पर्यंत मार्गविण्यात येत आहेत.

पुरस्काराचे स्वरूप- रुपये १,००,०००/- व प्रशस्तिपत्रक

(शासन निर्णय क्रमांक साफुपु-२०२४/प्र.क्र.१२/७१६८४५/मशि-२ दि.०२.०२.२०२४)

पुरस्काराचे निकष-

१. अर्ज करणारी महिला ही शिक्षिका म्हणून कार्यरत नसावी.
२. सदरहू महिलेने आपल्या प्रस्तावासोबत, पोलिस पडताळणी अहवाल जोडणे आवश्यक आहे.
३. सदरहू महिलेचे वय ५० वर्षे पूर्ण असावे.
४. महिला सबलीकरण, स्त्री शिक्षण, पददलितांचे शिक्षण, महिलांसाठी सामाजिक परिवर्तनाचे कार्य, स्त्रीभ्रूणहत्या प्रतिबंधात्मक कार्य, पल्स पोलिओ मोहिमेचे कार्य, दलित आदिवासी, विमुक्त भटक्या जाती-जमाती गलिच्छ वस्ती सुधारणा, वंचित क्षेत्रातील महिलांकरिता केलेले कार्य, अपंग व्यक्तीच्या पुनर्वसनासाठी व नैसर्गिक आपत्तिग्रस्तासाठी केलेले कार्य, महिला व बाल हक्क यांचेसाठी केलेले कार्य तसेच अत्याचारित महिलांना मोफत कायदेविषयक सल्ला देण्याचे कार्य व मोफत वैद्यकीय उपचार व सल्ला देण्याचे कार्य, त्यांच्यासाठी मोफत आरोग्य शिबिरे आयोजित करण्याचे कार्य, बचत गटाची स्थापना करणे, महिलांसाठी स्वयंरोजगार, कुटीर उद्योग सुरू करून देण्याचे कार्य तसेच वृध्द व निराधार महिलांसाठी वृध्दाश्रम स्थापन करण्याचे कार्य, अनाथ बालकांसाठी अनाथालये स्थापन करणे, महिलांना सहकार क्षेत्रातून उद्योगाकरिता प्रोत्साहित करणे, वेश्याव्यवसाय क्षेत्रातील महिलांचे पुनर्वसन करणे व आरोग्य सेवा उपलब्ध करणे, कौटुंबिक अत्याचारग्रस्त महिलांना समुपदेशन करणे इत्यादी क्षेत्रात केलेले भरीव कार्य.

तरी इच्छुक महिलांनी शासन निर्णय पाहून आपले परिपूर्ण प्रस्ताव खालील प्रपत्रात माहिती भरून त्यांच्या संबंधित पुरावे म्हणून प्राप्त प्रशस्तिपत्रके, वर्तमानपत्रातील कात्रणे, पोलीस पडताळणी अहवालासह, संचालक, उच्च शिक्षण, शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण) बहिरट पाटील चौक, हॉटेल मॅनेजमेंट कॉलेजसमोर, मॉडेल कॉलनी, शिवाजीनगर, पुणे-४११०१६, येथे व्यक्तिशः किंवा पोस्टाद्वारे तीन प्रतीत ०१.१०.२०२६ पर्यंत सादर करण्यात यावेत. प्रपत्राचा नमुना खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव व पत्ता | दूरध्वनी क्र./मोबाइल क्र. | शिक्षण | केलेल्या कार्यांचा तपशील अभिलेख्यासह | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

दिनांक ०१.१०.२०२६ नंतर आलेल्या प्रस्तावांचा विचार करण्यात येणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

टीप- ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले पुरस्कार ही योजना फक्त सामाजिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या महिलांसाठीच आहे.

(डॉ. शैलेंद्र देवळाणकर)
शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे-१६

(Dgipr No. 2026-27/No.5/C-2565)